# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६'

## मानपत्र

मानवी जीवनामध्ये उत्कर्षाचा रस्ता हा कधीच सरळ व निर्विघ्न नसतो. त्यात चढउतार असतात, अचानक येणा-या अडचणी व अनपेक्षित संकटे यामुळे उत्कर्षाकडे होणारी वाटचाल थांबते की काय अशीही परिस्थिती निर्माण होते. अशा संकट समयी सर्वसाधारणपणे मानवी प्रतिक्रिया ही दोन प्रकारची असते. एक म्हणजे संकटापुढे माघार घेणे व दुसरी म्हणजे दुर्दम्य इच्छाशक्तीने व परिश्रमपूर्वक संकटावर मात करणे. आजच्या राज्यस्तरीय पुरस्काराचे मानकरी श्री. प्रतापशेठ साळुंखे यांच्या आयुष्यातही असे अनेक कसोटीचे व निर्वाणीचे प्रसंग आले. परंतु त्या त्या वेळी आपल्या इच्छा शक्तीने व अविरत मेहनत घेण्याच्या वृत्तीने त्यावर मात करुन त्यांनी आज केवळ आपली व कुटुंबियांची आर्थिक परिस्थितीच सुधारली एवढे नाही तर समाजामध्ये मानाचे स्थान मिळविले आहे.

श्री. प्रतापशेठ साळुंखे हे खानापूर तालुक्यातील विटया जवळच्या पारे नावाच्या एका लहान गावात जन्माला आले. त्यावेळी त्यांच्या वडिलांची व कुटुंबाचीही आर्थिक स्थिती चांगली होती. वडील महादेव साळुंखे हे मद्रासला गलाईचा म्हणजेच सोन्या चांदीचे दागिने शुध्द करण्याचा व्यवसाय करत असत. तीनही चुलत्यांमध्ये ते एकुलते एक होते व काकीने त्यांना दत्तक घेण्याचे ठरविले होते. परंतु काकीने अचानक निर्णय बदलला व दुस-याच एका मुलाला दत्तक घेतले. त्यामुळे होती नव्हती ती सर्व संपत्ती गेली. गावातील प्रचंड मोठा वाडा सोडून वडील जुन्या छोटया घरात आले व थोडी फार शेतीवाडी होती ती करु लागले. परिस्थिति इतकी हलाखीची होती की, एका बाजूला बैल व दुस-या बाजूला दहा/बारा वर्षाचा प्रताप खांद्यावर जू घेऊन कोळपणी करीत. प्रतापला शिक्षणाची आवड होती. परंतु पाटी घ्यायला पैसे नव्हते. दोन दोन मैल अनवाणी पायाने शाळेला जावे लागे. ही स्थिति पाहून त्यांच्या मामाने प्रतापला गलाईच्या व्यवसायामध्ये घालायचे असे ठरविले. शिक्षण बंद झाले. प्रताप सर्वात थोरला. त्यामुळे वडिलांचा कोलमडलेला संसार सांभाळण्याची जबाबदारी त्याच्यावर आली.

तेरा / चौदा वर्षांचा प्रताप आलेप्पीला आला. बरोबर त्यांचा चुलत भाऊ कृष्णा दादा होता. त्याला परिसर माहित होता. पण भाषेची अडचण होती. रहायला जागा नव्हती. दोघेही मंदिरातील सभा मंडपाच्या कोप-यात मुक्काम करुन होते. तिथेच एक मोकळी जागा मिळवून त्यांनी झोपडी वजा दुकान मांडले. हळूहळू काम मिळायला लागले. परंतु आलेप्पी येथील व्यवसायाची मर्यादा लक्षात घेऊन प्रतापदादांनी तेथील दुकान बंद केले व ते कोचीनला गेले. त्यांनी व कृष्णा दादा यांनी कमरेचे चांदीचे कडदोरे विकून गलाईची आयुधे घेतली. हळूहळू इतरांचा विश्वास मिळवून त्यांनी व्यवसाय वाढविला व स्वतःची भट्टी घातली. पाच/सात वर्षे उत्तम व्यवसाय झाला. त्यामुळे पारे गावात त्यांनी मोठा बंगला बांधला, गाडी घेतली. परंतु अचानक सुवर्ण नियंत्रण कायदा आला व गलाईच्या धंदयात अडचणी दिसू लागल्या. तेव्हा त्यांनी भावाला शिकायला पाठवून दिले. त्याच वेळी पारे गावातील घरावर दरोडा पडल्याची वार्ता मिळाली. घरातील सर्व संपत्ती धुऊन निघाली. संकटे एकटी येत नाहीत याचा त्यांना अनुभव आला. कॉफेपोसा (COFEPOSA) कायद्याखाली त्यांना अटक होऊन तुरुंगवास घडला. त्यांचा गलाईचा धंदा इतका उत्तम चालला होता की, दूरदूरच्या ठिकाणांवरुन सोने चांदी त्यांच्याकडे शुध्द करण्याकरिता येत असत. त्याचा फायदा घेऊन पुण्या मुंबईहून येणारा माल पोलीसांनी पकडला की, संबंधित लोक बेलाशक प्रताप दादांचे नांव घ्यायचे. त्यामुळे तेच या काळया धंद्यात आहेत अशा गैरसमजुतीतून त्यांना अटक झाली होती. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी केरळ सरकारकडे विचारणा केली व त्यानंतर चौकशी होऊन प्रतापदादांची निर्दोष सुटका झाली. त्या प्रसंगातून गलाई व्यवसायामध्ये काम करणा-यांची राष्ट्रव्यापी संघटना काढण्याचा विचार पुढे आला व त्यांच्या अध्यक्षतेखाली नॅशनल गोल्ड ॲन्ड सिल्वर रिफायनर्स ॲन्ड ज्वेलर्स असोसिएशन निर्माण झाली. गलाईच्या धंदयातील मर्यादा लक्षात घेऊन प्रतापदादांनी एर्नाकुलम येथे ब्ल्यू डायमंड हॉटेल चालू केले. शालीमार ज्वेलर्स या नावाने उद्योग सुरु केला व ग्राहकांना प्रमाणित सोने मिळावे यासाठी हॉलमार्कींगची व्यवस्था सुरु केली. शिवप्रताप पत संस्था स्थापन केली. शिवप्रताप मंगल कार्यालय सुरु केले. अशा त-हेने सुरुवातीच्या गलाई व्यवसायात अडकून न पडता त्यांनी अनेक व्यवसाय हाती घेऊन व्यापक पायावर आपले उद्योगांचे साम्राज्य उभे केले.

शिक्षणाची आवड असूनही शिकता न आल्याने त्यांनी आपल्या पुढच्या पिढीच्या शिक्षणावर विशेष भर दिला. आज त्यांच्या कुटुंबातील सर्वजण उच्चशिक्षित आहेत. कौटुंबिक कलहामुळे त्यांचे आयुष्य पणाला लागले होते. परंतु आपल्या परिश्रमाने व प्रामाणिकपणे केलेल्या व्यवसायाने त्यांनी आपल्या जीवनाचे सोने केले. नुकताच त्यांचा अमृत महोत्सव साजरा झाला. अवघड परिस्थितीतून आर्थिक उत्कर्ष व सामाजिक प्रतिष्ठा मिळविल्यानंतरही त्यांचे पाय जमिनीवरच आहेत. त्यांच्या शब्दात सांगावयाचे म्हणजे 'ज्याला रुपयाची किंमत कळाली तोच खरा श्रीमंत. पैसा कितीही मिळवा, पण स्वप्नाला व स्वतःच्या गतकाळाला कधी विसरू नका. सतत जमिनीवर रहा. मिळालेल्या पैशाचा सदुपयोग करा. पैशाचा माज येऊ देऊ नका. त्यामुळे आपल्यात आणि सामान्य जनमाणसात अंतर येते. निर्व्यसनी रहा. स्वतःच्या शरीरावर प्रेम करा, मन व मनगट मजबूत करा. म्हणजे जीवनामध्ये येणा-या प्रत्येक अडचणीतून तुम्ही तरुन जाल आणि जो तरुन जातो त्यालाच ख-या अर्थाने तरुण म्हणतात'.

आयुष्यात आलेल्या बिकट प्रसंगांवर दुर्दम्य इच्छा शक्तीने मात करुन त्यांनी स्वतःची व कुटुंबाच्या प्रगतीची उच्च शिखरे गाठली. त्याबरोबरच ज्या समाजातून आणि परिसरातून ते उभे राहिले त्यांच्या ऋणांची जाणीव ठेवून त्यांनी अनेकांना उन्नतीचा मार्ग मिळवून दिला. अशा या असाधारण धैर्याच्या अष्टपैलू उद्योजकाला व समाज धुरीणाला 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक २०१६' पारितोषिक देताना यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला विशेष आनंद होत आहे.

मुंबई
दिनांक : २५ नोव्हेंबर २०१६

शरद पवार
अध्यक्ष,
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई